Add. D.G.P. (
I.G.P. (Trg.)
Sr. O.S. (Trg.)
O.S. (Trg.)
Dated. 01 MAR 2019
म. मं. अ. रा. मुंबई
28 FEB 2019
N-1811

पोलीस दल आधुनिकीकरण योजना
Student Police Cadet (SPC) Programme
राज्यस्तरीय सनियंत्रण समिती व जिल्हास्तरीय सुकाणू समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक एमआयएस-१३१८/प्र.क्र.३५२/पोल-४,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२,
दिनांक :- २७ फेब्रुवारी, २०१९.

**संदर्भ** :- १) उप सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र, क्र. २१०११/४७/२०१७-PM-I, दि.०४.०४.२०१८.
२) Student Police Cadet (SPC) Programme Handbook, BPR & D, New Delhi.
३) अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. टिआरजी३/Police Cadet Programme/७७६/२०१७/२७४१, दि.१४.०९.२०१८.

**प्रस्तावना** :- गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्यामार्फत सरकारी शाळांतील इयत्ता ८ वी व ९ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाअंतर्गत Student Police Cadet (SPC) Programme हा संपूर्ण देशभरात शालेय शिक्षणासोबतच राबविण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाचा उद्देश शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये चांगली नितीमुल्ये रुजवून जबाबदार नागरीक बनविणे हा आहे. महाराष्ट्र राज्यातील सरकारी शाळांमधील इयत्ता ८ वी व ९ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम राबविण्यात करण्यात येणार असून त्याअंतर्गत गुन्ह्याचा प्रतिबंध, रस्ते सुरक्षा व वाहतुक जागरुकता, भ्रष्टाचार निर्मुलन, संवेदनशिलता व सहानुभुती, महिला व बालकांची सुरक्षितता, सामाजाचा विकास, दुष्ट सामाजिक प्रवृत्तीस आळा घालणे, नितीमुल्ये, शिस्त, आपत्ती व्यवस्थापन व स्वच्छता इ. विषयाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदर योजनेची अंमलबजावणीकरिता राज्यस्तरीय सनियंत्रण समिती व जिल्हास्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यास व जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी यांची नेमणूक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- स्टुडंट पोलीस कॅडेट कार्यक्रम राबविण्याकरिता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यस्तरीय सनियंत्रण समिती व जिल्हास्तरीय सुकाणू समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

**अ) राज्यस्तरीय सनियंत्रण समिती** :-

| | |
|---|---|
| १) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग - | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग - | सदस्य |
| ३) अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई - | सदस्य-सचिव |

**आ)जिल्हास्तरीय सुकाणू समिती:-**

| | |
|---|---|
| १) संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी - | अध्यक्ष |
| २) जिल्हा शिक्षणाधिकारी - | सदस्य |
| ३) पोलीस उपायुक्त (मुख्यालय)/ अपर पोलीस अधीक्षक - | सदस्य-सचिव |

२. संबंधित पोलीस उपायुक्त (मुख्यालय)/ अपर पोलीस अधीक्षक हे संबंधित पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त व संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी नेमून दिलेले असतील व त्यांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज करतील. तथापि, एका जिल्हयात पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक या दोघांचे कार्यक्षेत्र असल्यास जिल्हास्तरीय सुकाणू समितीमध्ये अपर पोलीस अधीक्षक हे अतिरीक्त सदस्य राहतील आणि पोलीस उपायुक्त (मुख्यालय) हे सदस्य सचिव राहतील. त्यानुषंगाने सदस्य सचिव यांनी संबंधित जिल्हास्तरीय सुकाणू समिती गठीत करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. त्याचप्रमाणे जिल्हास्तरीय सुकाणू समित्यांचे सनियंत्रण करण्यासाठी राज्यस्तरीय नोडल ऑफिसर यांची सनियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. तसेच पोलीस उपायुक्त (मुख्यालय)/ अपर पोलीस अधीक्षक हे पोलीस उपनिरीक्षक किंवा त्यावरील दर्जाच्या अधिकारी यांची जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणून नेमणूक करतील.

४. सदर योजनेची अंमलबजावणी ही अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येईल. तसेच, ते सदर योजनेच्या अंमलबजावणीचा त्रैमासिक आढावा घेऊन शासनास अहवाल सादर करतील.

५. सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.३१.०३.२०१७ व दि.०४.०४.२०१८ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या असून त्या यासोबत **परिशिष्ट-अ** म्हणून जोडलेल्या आहेत. त्याचप्रमाणे या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता Bureau of Police Research and Development, New Delhi यांनी Student Police Cadet (SPC) Programme- A Handbook तयार केले असून ते www.bprd.nic.in (spc>spc handbook) यावर उपलब्ध असून ते जिल्हास्तरीय सुकाणू समितीचे सदस्य-सचिव डाऊनलोड करुन समितीस उपलब्ध करुन देतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सोमनाथ पोटरे)
अवर सचिव, गृह विभाग

प्रति,

- प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई
- महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
- सर्व पोलीस आयुक्त
- संचालक, महाराष्ट्र पोलीस प्रशिक्षण अकादमी, नाशिक.
- सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
- सर्व जिल्हा शिक्षणाधिकारी
- सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
- निवडनस्ती, गृह विभाग/पोल-४